॥ तोच चंद्रमा नभांत ॥

गायकः सुधिर फडके
गीतः शांता शेळके
संगीतः सुधिर फडके

तोच चंद्रमा नभांत तीच चैत्रयामिनी
एकांती मजसमीप, तीच तूंहि कामिनी ॥ धृ ॥

नीरवता ती तशीच, धुंद तेंच चांदणे,
छायांनी रेखियले, चित्र तेंच देखणे।
जाईचा कुंज तोच तीच गंधमोहिनी
एकांती मजसमीप, तीच तूंहि कामिनी ॥ १ ॥

सारें जरि तें तसेंच, धुंदि आज ती कुठे,
मीहि तोच तीच तूंहि, प्रीति आज ती कुठे?
ती न आर्तता उरांत स्वप्न तें न लोचनी
एकांती मजसमीप, तीच तूंहि कामिनी ॥ २ ॥

त्या पहिल्या प्रीतीच्या आज लोपल्या खुणा,
वाळल्या फुलांत व्यर्थ गंध शोधतो पुन्हा।
गीत ये न तें जुळून भंगल्या सुरांतुनी
एकांती मजसमीप, तीच तूंहि कामिनी ॥ ३ ॥